# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २०/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आण्णाप्पा शंकर अथणी,<br>मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आण्णाप्पा शंकर अथणी, मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग विरुध्द तक्रार दि.२०.४.२०१२ रोजी दाखल केली.त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार व त्यांचे वडील कै. शंकर रामा अथणी यांचे नांवे वेगवेगळी दोन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन भरले. वीज मंडळाच्या अग्रहक्क यादीमध्ये या चलन भरलेल्या पावत्यांची नोंद नाही वा ती कमी केलेली आहे या कारणास्तव आजतागायत वीज पुरवठा केलेला नाही. अर्जदार यांनी गट क्र. २५९ मध्ये चलन रु. १८२०/- पावती क्र. ६७२३६१ दि. १२.८.१९९६ रोजी भरले व वडील कै. शंकर रामा अथणी यांचे नांवे गट क्र. ३६२ मध्ये चलन रु. १८२०/- पावती क्र. ६७२३६० दि. १२.८.१९९६ रोजी भरले. अर्जदाराने वि.प.कडे दि. ३०.११.२०११ रोजी अर्ज दिला व त्याची पोच सोबत जोडली आहे. अर्जदाराने वडील मयत असलेने त्यांचा नाव बदली प्रस्ताव देणेस तयार असल्याचे अर्जात नमूद केले आहे. अर्जदार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ रोजी गाऱ्हाणे दाखल केले, त्यामध्ये आजतागायत कोणताही आदेश पारीत झालेला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - अर्जदार ग्राहकाने वाढीव चलन भरणेस तयार आहे, नाव बदली प्रस्ताव देणेस तयार आहे तरी वीज कनेक्शन मिळणेसाठी मार्गदर्शन व्हावे व वीज पुरवठा मिळावा अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.५.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहक व श्री. शंकर रामा अथणी यांचे नांवे नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. १२.८.१९९६ रोजी चलन भरल्याचे मान्य केले आहे. दोन्ही ग्राहकांनी उप विभागामध्ये चाचणी अहवाल दाखल केला नसल्याने त्यांचे नांव जेष्ठता यादीतून वगळलेले आहे. चाचणी अहवाल दिल्यानंतर त्यांना वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे. कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकातील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही, त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी तक्रारदार ग्राहकाचे नांव दि. ३१.३.२०१० ला नोटीस देऊन यादीतून कमी केले असल्याचे सांगितले. त्याची कागदपत्रे दि. ३१.५.२०१२ पर्यंत देण्याचे मंचासमोर मान्य केले, परंतु दि. ४.६.२०१२ पर्यंत कुठलीही कागदपत्रे वि.प.ने मंचासमोर हजर केली नाहीत.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केलेप्रमाणे विद्युत पुरवठा करण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

२) उत्तर : होय

कारणमिमांसा

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार अर्जदाराचे वडील कै. शंकर रामा अथणी यांचे नांवे गट क्र. ३६२ मध्ये चलन रु. १८२०/- व अर्जदार ग्राहक श्री. आण्णाप्पा शंकर अथणी यांनी गट क्र. २५९ मध्ये चलन रु. १८२०/- दि. १२.८.१९९६ रोजी भरले आहे हे मान्य आहे. लेखी अहवालानुसार दोन्ही ग्राहकांनी उप विभागामध्ये चाचणी अहवाल दाखल केला नसल्याने त्यांचे नांव जेष्ठता यादीतून वगळलेले आहे. तक्रारदार यांनी दि. ३०.११.२०११ रोजी वीज जोडणी मिळण्या संदर्भात अर्ज दिला त्याची पोच तक्रारीसोबत हजर केली आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मयत कै. शंकर रामा अथणी यांचे नांवे मागणी केलेले गट क्र. ३६२ मध्ये विद्युत पुरवठ्यासाठी नांव बदलाची प्रक्रीया प्रलंबित आहे असे गृहीत धरले किंवा त्यांचे नांव कमी केले हे ग्राह्य धरले तरी तक्रारदार श्री. आण्णाप्पा शंकर अथणी यांनी दि. १२.८.१९९६ रोजी चलन भरुन शेवटी दि. ३०.११.२०११ लेखी अर्ज देऊनही वि.प.ने मंचासमोर लेखी अहवाल देईपर्यंत कुठलीही कार्यवाही केली नाही. यावरुन तक्रारदार यांचे वीज जोडणीचे काम वि.प.ने दूर्लक्षित केले आहे, कमीत कमी पूर्वी भरलेले पैसे कमी आहेत, जादा भरावे लागतील यासाठी नोटीसही दिली नाही. त्यामुळे श्री. आण्णाप्पा शंकर अथणी यांना त्वरित १ महिन्यात वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल. तसेच मयत शंकर रामा अथणी यांचे मागणीनुसार गट क्र. ३६२ मध्ये वीज जोडणी साठी त्यांचे नांव बदली प्रस्ताव मंजूर करुन त्वरित वीज जोडणी देण्याचे आदेश करणे योग्य होईल. तक्रारदार यांनी आपल्या तक्रारीत विलंबाबद्दल भरपाईची मागणी केलेली नाही, तरीही वि.प.ने आपल्या लेखी अहवालात त्याबाबत बचाव घेतला आहे. अर्जदार ग्राहकांना वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे, परंतु त्यांनी नवीन चाचणी अहवाल द्यावा अशी अट घातली आहे. हे विलंबाचे सबळ कारण होऊ शकत नाही, त्यामुळे तक्रारदार श्री. आण्णाप्पा शंकर अथणी यांनी वाढीव चलन रक्कम भरल्यानंतर व चाचणी अहवाल दिल्यानंतर १ महिन्यात दि. ३१.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा. तसेच वि.प.ने अर्जदाराकडून मयत कै.शंकर रामा अथणी या ऐवजी अर्जदाराचा नांव बदली प्रस्ताव स्वीकारुन त्यांनाही गट क्र. ३६२ मध्ये वीज जोडणी दि. ५.७.२०१२ पर्यंत द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार श्री. आण्णाप्पा शंकर अथणी यांना त्यांचे गट क्र. २५९ मध्ये दि. ३१.७.२०१२ (अेकतीस जुलै दोन हजार बारा) पर्यंत वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा.

३) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी कै. शंकर रामा अथणी ग्राहकाचा नाव बदली प्रस्ताव स्वीकारावा व अर्जदारास गट क्र. ३६२ मध्ये दि. ३१.७.२०१२ (अेकतीस जुलै दोन हजर बारा) पर्यंत वीज जोडणी द्यावी. अर्जदार ग्राहकाने स्वत:साठी व नांव बदली झाल्यानंतर दोन्ही कनेक्शनसाठी वाढीव चलन रक्कम वि.प.कडे त्वरित जमा करावी.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com